# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०७/२०२४ (गुरूवार) दुपार**

---

## पो.स्टे. पारशिवनी हद्दीमधील सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक १०/०७/२०२४ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय रामटेक विभाग रामटेक येथील स्टाफ पोस्टे पारशिवनी परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, मौजा पारशिवनी येथील जुना बस स्टॉप जवळील आंबेडकर पुतळया जवळ एक इसम हा लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन जुगाराचा खेळ खेळवत आहे. अशा माहिती वरून पारशिवनी येथील जुना बस स्टॉप जवळील आंबेडकर पुतळया जवळ सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— अनवर खॉ वल्द मोहम्मद खॉ पठाण, वय ५८ वर्ष रा. प्रभाग क्र. १४ पारशिवनी** हा सट्टापट्टीचे आकडे लिहताना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता एक पांढ—या रंगाचा सट्टापट्टीचा आकडे लिहीलेला कागद, एक निळया रंगाचा बॉलपेन किं. ०५.०० रू, नगदी १६१० रू असा एकुण किं. १६१५ रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे पारशिवनी कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनाखाली सफौ. दिलीप आगरकर, पोशि सुर्यकांत वावरे यांनी पार पाडली.

## पो.स्टे. सावनेर हद्दीमधील सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक १०/०७/२०२४ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील मौजा बाजार चौक पाटणसावंगी येथे सार्वजनिक जागेत चिंतामन राऊत नावाचा इसम हा लोकांकडुन सट्टापट्टीचे जुगाराचे आकडे व पैसे घेवुन ते जुगाराचे आकडे कागदावर लिहून देवुन वरली मटक्याचा हारजितचा जुगार खेळवत आहे. अशी खात्रीशिर खबर मिळाल्याने सदर ठिकाणी जावुन रेड केली असता **आरोपी नामे— चिंतामन सखाराम राऊत, वय ५० वर्षे, रा. वार्ड नं. ३ नविन पाटनसावंगी ता. सावनेर** याची अंगझडती घेतली असता त्याच्या अंगझडतीत कल्यान वरली मटका वेगवेगळे जुगाराचे आकडे लिहीलेल्या कागदाची चिट्ठी, नगदी ५५०/— रु., एक निळया शाहीचा बॉल पेन किं ५ व एक निळया रंगाचा कार्बन कि. ०५/— रु. असा एकुन ५६०/— रु. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोनि. श्री. रविंद्र मानकर, सपोनि मोकाशे, पोहवा राजेश हावरे, सुरेन्द्र वासनिक, पो.ना. कपोल तभाने, पो.शि. अंकुश मुळे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर